International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 4 January – February - 2026

# आदिवासी महिला आणि शिक्षण : सध्यस्थिती, समस्या व उपाययोजना

**डॉ. श्रीकांत मारुती फुलसुंदर**

*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे अर्थशास्त्र विभाग व संशोधन केंद्र ग्रामोन्नती मंडळाचे , कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव (पुणे)*

*Corresponding Author – डॉ. श्रीकांत मारुती फुलसुंदर*

**DOI - 10.5281/zenodo.18886997**

**गोषवारा :**

*प्रस्तुत संशोधन लेखामध्ये "आदिवासी महिला आणि शिक्षण : सध्यस्थिती, समस्या व उपाययोजना" या विषयाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. कोणत्याही समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासामध्ये महिलांच्या शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तथापि, आदिवासी महिला या लिंग, सामाजिक गट आणि भौगोलिक दुर्गमता अशा त्रिस्तरीय वंचनांचा सामना करत असल्यामुळे त्यांची शैक्षणिक स्थिती आजही मागासलेली दिसून येते.*

*या संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांवर आधारित वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. शासकीय अहवाल, 2011 च्या जनगणनेची आकडेवारी, शैक्षणिक धोरणे, विविध संशोधन लेख व संदर्भग्रंथांचा अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की, गेल्या काही दशकांत आदिवासी महिलांच्या साक्षरतेत वाढ झाली असली तरी ती अद्याप आदिवासी पुरुषांच्या व राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत कमी आहे. विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर आदिवासी मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक आढळते.*

*संशोधनात असे आढळून आले आहे की, गरिबी, बालविवाह, घरगुती व शेतीविषयक जबाबदाऱ्या, दुर्गम भागातील अपुऱ्या शैक्षणिक सुविधा, सुरक्षिततेचा अभाव, महिला शिक्षकांची कमतरता, तसेच स्थानिक भाषा व संस्कृतीशी विसंगत अभ्यासक्रम ही आदिवासी महिलांच्या शिक्षणातील प्रमुख अडचणी आहेत. शासनाने विविध शैक्षणिक योजना राबविल्या असल्या तरी त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीतील त्रुटी शिक्षणातील प्रगतीस अडथळा ठरत आहेत.*

*संशोधन लेखात आदिवासी महिलांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी महिलाकेंद्रित धोरणे, सामाजिक जागरूकता, सार्वजनिक–खासगी भागीदारी, तंत्रज्ञानाचा वापर, सुरक्षित शालेय वातावरण, आर्थिक प्रोत्साहन योजना व बालविवाह प्रतिबंध यांसारख्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. आदिवासी महिलांचे शिक्षण हे समतामूलक, समावेशक व शाश्वत सामाजिक विकासाचे प्रभावी साधन असल्याचे या संशोधनातून अधोरेखित होते.*

***ठळक मुद्दे :-** आदिवासी महिला, स्त्रीशिक्षण, साक्षरता दर, शैक्षणिक गळती, सामाजिक-आर्थिक अडथळे, शासकीय शैक्षणिक योजना, शैक्षणिक सक्षमीकरण.*

**प्रस्तावना:**

कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब त्या समाजातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जावरून स्पष्टपणे दिसून येते. महिलांचा दर्जा उंचावला की समाजात सकारात्मक परिवर्तन घडते. मात्र, आजही लोकसंख्येतील जवळजवळ निम्मा हिस्सा असलेल्या महिलांना अनेक क्षेत्रांत समान संधी व अधिकार मिळताना दिसत नाहीत. यामध्ये आदिवासी महिलांची

स्थिती अधिक चिंताजनक आहे. आदिवासी महिला या लिंग, सामाजिक गट आणि भौगोलिक दुर्गमता अशा त्रिस्तरीय वंचनांचा सामना करत आहेत. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक सहभाग या सर्व क्षेत्रांत त्या मागे राहिलेल्या दिसून येतात.

शिक्षण हे केवळ व्यक्तीच्या बौद्धिक विकासाचे साधन नसून, ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. स्त्रीशिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, आत्मनिर्भरता आणि सामाजिक जाणीव विकसित होते. कोणत्याही समाजाची सांस्कृतिक प्रगती व आर्थिक समृद्धी ही त्या समाजातील स्त्रियांच्या शैक्षणिक स्तरावर अवलंबून असते. भारतीय समाजाच्या इतिहासाकडे पाहिल्यास, वेदकाळात स्त्रियांना शिक्षणाचा समान अधिकार होता; परंतु कालांतराने सामाजिक बंधनांमुळे हा अधिकार संकुचित झाला. आधुनिक काळात समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली असली, तरी आदिवासी महिलांपर्यंत शिक्षणाचे लाभ अपेक्षित प्रमाणात पोहोचलेले नाहीत.

भारतीय राज्यघटनेने महिला व आदिवासींच्या सामाजिक व शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत. कलम 14 व 15 अंतर्गत समानता व भेदभावमुक्ततेची हमी देण्यात आली असून, अनुसूचित जमातींसाठी विशेष सवलती व योजना राबविण्यात येत आहेत. तरीही, प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटी, सामाजिक अडथळे आणि जागरूकतेचा अभाव यांमुळे आदिवासी महिलांचे शैक्षणिक सक्षमीकरण अपेक्षित गतीने होत नाही.

या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत संशोधन लेखात आदिवासी महिलांच्या शिक्षणाची सध्यस्थिती, शिक्षणासंदर्भात भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या आणि त्यावर प्रभावी उपाययोजना यांचे अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. आदिवासी महिलांच्या शिक्षणाची सध्यस्थिती अभ्यासणे.
2. आदिवासी महिलांच्या शिक्षणावर परिणाम करणाऱ्या सामाजिक-आर्थिक घटकांचे विश्लेषण करणे.
3. शासकीय शैक्षणिक योजना व धोरणांची प्रभावीता तपासणे.
4. आदिवासी महिलांचे शैक्षणिक सक्षमीकरण वाढविण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**संशोधनाची गृहितके:**

1. आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती पुरु षांच्या तुलनेत कमी आहे.
2. सामाजिक-आर्थिक घटकांचा आदिवासी महिलांच्या शिक्षणावर नकारात्मक परिणाम होतो.
3. शासकीय शैक्षणिक योजना असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे अपेक्षित शैक्षणिक प्रगती साध्य होत नाही.

**संशोधन पध्दती**:

प्रस्तूत संशोधन लेख हा शासकीय अहवाल, संबधित विषयाची पुस्तके, नियतकालिके, संशोधन लेख ,प्रकाशित व अप्रकाशित संशोधने, वर्तमानतत्रातील लेख, विविध संदर्भ ग्रंथ आणि संकेतस्थळावरून मिळवलेल्या दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. तसेच 2011 च्या जनगणनेची आकडेवारी आणि शैक्षणिक धोरणांचे अहवाल यांचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या

दुय्यम स्त्रोतावर आधारित शोधनिबंधाची वर्णनात्मक पध्दतीने मांडणी केली आहे.

**आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती:**

आदिवासी समुदायाच्या शैक्षणिक विकासाला प्राधान्य देऊन किमान आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक समानता प्रस्थापित करण्यासाठी सरकार विविध शैक्षणिक योजना राबविते. यामध्ये शासकीय आश्रमशाळा, एकलव्य इंग्रजी माध्यम निवासी शाळा, अनुसूचित जमातीतील विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी शासकीय वसतीगृहे, शालांत परीक्षेनंतर शिष्यवृत्ती योजना, शिक्षण व परीक्षेच्या शुल्काची प्रतिपूर्ती, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्ता, विद्यावेतन, तसेच आदिवासी मुलींच्या शालेय गळतीला आळा घालण्यासाठी प्रोत्साहन भत्त्यांचा समावेश आहे. आदिवासी समाज शैक्षणिकदृष्ट्या खूप मागे असल्यामुळे 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आदिवासी विद्यार्थ्यांचा शिक्षणातील टक्का वाढविण्यासाठी विशेष तरतूदी करण्यात आल्या होत्या. त्यात शाळेत शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे, मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, लेखन सामुग्री देणे, विद्यावेतन देणे. या सुविधांव्यतिरिक्त आदिवासी मुलींना उपस्थिती भत्ता देखील दिला जावा अशी शिफारस करण्यात आलेली होती. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध शैक्षणिक योजना राबवूनही आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती पुरुषांच्या तुलनेत कमीच असलेली दिसते.

**आदिवासी महिला आणि शिक्षण- साक्षरता प्रमाण:**


शिक्षण व साक्षरतेचे प्रमाण हे कोणत्याही समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे महत्त्वाचे निर्देशक मानले जातात. आधुनिक समाजात शिक्षण हे केवळ एका विशिष्ट वर्गापुरते मर्यादित न राहता, जात, वर्ग, लिंग, वंश किंवा धर्मभेद न करता सर्वांसाठी अत्यावश्यक ठरले आहे. विशेषतः महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे प्रभावी साधन असून, त्यातून महिलांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता व आत्मनिर्भरता विकसित होते. मात्र, औपचारिक शिक्षणाची मर्यादित उपलब्धता ही आजही आदिवासी महिलांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांपैकी एक आहे (माजी, 2016)

स्वातंत्र्यपूर्व काळात, विशेषतः 1950 च्या दशकापूर्वी, आदिवासी शिक्षणासाठी कोणतेही थेट व व्यापक स्वरूपाचे सरकारी कार्यक्रम अस्तित्वात नव्हते (हसनैन, 1911). भारतीय राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर मात्र केंद्र व राज्य सरकारांनी आदिवासी समाजाच्या, विशेषतः महिलांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी विविध धोरणे व योजना राबविण्यास सुरुवात केली. तरीसुद्धा, प्रत्यक्ष स्थितीत आदिवासी महिलांचे शैक्षणिक मागासलेपण स्पष्टपणे जाणवते.

**तक्ता क्र. 01- अनूसुचित जमातीची साक्षरता (सन- 1961-2011)**

| अ.क्र. | वर्ष | एकूण लोकसंख्या | आदिवासी | आदिवासी पुरुष | आदिवासी महिला |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1961 | 28.3 | 8.53 | 13.83 | 3.16 |
| 2 | 1971 | 34.45 | 11.30 | 17.63 | 4.85 |
| 3 | 1981 | 43.57 | 16.35 | 24.25 | 8.05 |
| 4 | 1991 | 52.21 | 29.60 | 40.65 | 18.19 |
| 5 | 2001 | 64.84 | 47.10 | 59.17 | 34.76 |
| 6 | 2011 | 72.99 | 58.96 | 68.53 | 49.35 |

*(Source: Ministry of Tribal Affairs 2013)*




उपरोक्त तक्ता व आलेख क्र. 01 नुसार, 2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार, भारताचा एकूण साक्षरता दर 72.19 टक्के असताना, अनुसूचित जमातींचा साक्षरता दर केवळ 58.96 टक्के आहे. 1961 ते 2001 या कालावधीत आदिवासी साक्षरतेत लक्षणीय वाढ झाली असून, ती 8.53 टक्क्यांवरून 58.96 टक्क्यांपर्यंत पोहोचलेली दिसून येते. याच कालावधीत आदिवासी महिलांचा साक्षरता दर 3.16 टक्क्यांवरून 49.35 टक्क्यांपर्यंत वाढलेला आहे. तथापि, आदिवासी समाजामध्ये शिक्षणातील लिंगविषयक तफावत आजही मोठ्या प्रमाणावर आढळते. 2011 च्या जनगणनेनुसार, आदिवासी पुरुषांचा साक्षरता दर 68.53 टक्के असताना, महिलांचा साक्षरता दर केवळ 49.35 टक्के आहे.

रामी (2012) यांनी गुजरात राज्यातील आदिवासीबहुल डांग जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास करताना असे स्पष्ट केले आहे की, सरकारी प्राथमिक शाळांमध्ये पाचवी इयत्तेनंतर आदिवासी मुलींच्या शाळा गळतीचे एक प्रमुख कारण म्हणजे मुलींसाठी स्वतंत्र व कार्यक्षम शौचालय सुविधांचा अभाव. यावरून शालेय पायाभूत सुविधांचा अभाव हा आदिवासी मुलींच्या शिक्षणातील गंभीर अडथळा ठरतो.

घोष (2007) यांनी झारखंडमधील 'हो' आणि 'महाली' तसेच पश्चिम बंगालमधील 'लोढा' या आदिवासी जमातींच्या अभ्यासातून असे निदर्शनास आणले आहे की, मुलींच्या शाळा प्रवेशाचे प्रमाण त्यांच्या पुरुष समकक्षांच्या तुलनेत कमी आहे. विशेषतः शेतीच्या हंगामात शाळा गळतीचे प्रमाण अधिक वाढते, कारण मुले व मुलींना पेरणी, लागवड, खुरपणी यांसारख्या शेतीकामांसाठी कुटुंबास मदत करावी लागते. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासी मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण ग्रामीण भागात अधिक आढळून येते.

आदिवासी मुलींच्या शाळा गळतीमागे अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यामध्ये शाळेचे घरापासून दूर असणे, मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित शौचालयांसह आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव, शाळेच्या परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्न, महिला शिक्षकांची कमतरता व शिक्षकांची अनियमित उपस्थिती, तसेच स्थानिक भाषेशी सुसंगत अभ्यासक्रमाचा अभाव यांचा प्रामुख्याने समावेश होतो. याशिवाय, पालकांमध्ये मुलींच्या शिक्षणाबाबत जागरूकतेचा अभाव, बालविवाहासंबंधी सामाजिक व सांस्कृतिक दबाव, तसेच घरगुती कामकाज व

बालसंगोपनासाठी मुलींवर असलेली जबाबदारी हे अंतर्गत घटकही शाळा गळतीस कारणीभूत ठरतात.

मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी पालकांचे संवेदनशीलता प्रशिक्षण व जागरूकता वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण व आदिवासी भागात प्राथमिक शिक्षणासोबतच कौशल्य विकास व व्यावसायिक प्रशिक्षणावर भर देणे गरजेचे आहे (संध्या राणी व इतर, 2011). तसेच, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये नमूद केल्याप्रमाणे (सेन आणि बारिक, 2020) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या संस्कृतीशी निगडित शिक्षण देणे आवश्यक ठरते. आदिवासी संस्कृती, लोककथा, इतिहास, कला व परंपरा अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांमध्ये आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

शाळांमध्ये नावनोंदणी व टिकवून ठेवण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी आदिवासी कथाकथन, चित्रकला, स्थानिक नृत्य व संगीत यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, ज्यातून स्वदेशी ज्ञानव्यवस्थेला चालना मिळू शकते (ब्रह्मानंदम आणि बाबू, 2016). यासोबतच, आदिवासी भागात क्रीडा अकादम्यांना प्रोत्साहन देऊन आदिवासी युवक व महिलांच्या नैसर्गिक क्रीडागुणांचा विकास करणे आवश्यक आहे. ॲथलेटिक्स, धनुर्विद्या, धावणे, बॉक्सिंग, फुटबॉल, क्रिकेट यांसारख्या खेळांमध्ये आदिवासी महिलांना संधी उपलब्ध करून दिल्यास त्या आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करू शकतात. मेरी कोम व दुती चंद यांसारख्या खेळाडूंनी मिळवलेले यश आदिवासी महिलांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

त्याचप्रमाणे, माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांसारख्या आदिवासी व्यक्तिमत्त्वांच्या यशोगाथा मुलींना सांगून त्यांना शिक्षणासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. समुपदेशनाच्या माध्यमातून आदिवासी मुलींना त्यांच्या स्वप्नांची जाणीव करून देऊन राष्ट्रीय विकासप्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी सक्षम केले पाहिजे.

आदिवासी महिलांच्या शिक्षणासमोरील समस्या बहुआयामी व गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे त्यावर मात करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, शिक्षक आणि समुदाय यांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत. केवळ सरकारी योजना पुरेशा नसून, आदिवासी समाजात जागरूकता वाढविणे व शिक्षकांचे प्रामाणिक समर्पणही तितकेच महत्त्वाचे आहे (मेटे आणि मॉडल, 2012).

मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी सरकारकडून मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, मुलींसाठी वसतिगृहे, सायकल योजना तसेच उपेक्षित आदिवासी भागांमध्ये विशेष शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. शैक्षणिक व पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून नावनोंदणी वाढविणे व शाळा गळती कमी करणे हा या योजनांचा प्रमुख उद्देश आहे. आदिवासी महिलांचे शिक्षण सुनिश्चित करण्यामागील अंतिम हेतू म्हणजे त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे, आरोग्यविषयक जाणीव निर्माण करणे, हक्क व कर्तव्यांची माहिती देणे आणि त्यांच्या स्वतःच्या विकास प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे होय.


**आदिवासी महिलांची शैक्षणिक गळती :**

आदिवासी समाजात मध्येच शाळा सोडून देणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. आदिवासी भागातील शैक्षणिक सोयी सुविधांचा अभाव तसेच आदिवासी कुटुंबांतील शैक्षणिक वातावरणाचा अभाव यामुळे अनेक आदिवासी मुले प्राथमिक स्तरावरच तर काही माध्यमिक स्तरावर शाळा सोडतात. खूपच थोडे मुले उच्च

शिक्षणासाठी जातात. खालील तक्ता क्र. 2 मध्ये आदिवासी मुलींचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्र. 02 - आदिवासी मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण**

| वर्ष | शैक्षणिक स्तर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्राथमिक | | माध्यमिक | | उच्च माध्यमिक | |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| 2014-15 | 7.97 | 7.98 | 27.42 | 26.96 | 3.09 | 2.77 |
| 2016-17 | 8.57 | 8.51 | 27.41 | 26.51 | 8.94 | 7.87 |




उपरोक्त तक्ता व आलेख क्र. 02 नुसार, आदिवासी मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण शिक्षणाच्या स्तरानुसार वाढते. प्राथमिक स्तरावर गळती 2014-15 मध्ये 7.98% होती, जी 2016-17 मध्ये 8.51% झाली. माध्यमिक स्तरावर ती 26.96% वरून 26.51% झाली, तर उच्च माध्यमिक स्तरावर 2.77% वरून 7.87% झाली. यावरून स्पष्ट होते की शिक्षणाचा स्तर वाढत जसा, तसे गळतीचे प्रमाणही वाढते, विशेषतः माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवर, ज्यामागे सामाजिक आणि आर्थिक अडथळे, शाळेचे अंतर, अल्प वयात लग्न तसेच प्रथा-परंपरा यांसारखी कारणे आहेत.

**आदिवासी महिलांच्या शैक्षणिक गळतीचे कारणे:**

आदिवासी मुलींच्या शिक्षणातील गळतीसाठी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भौतिक अशी अनेक कारणे जबाबदार आहेत. मुलींचे लवकर होणारे विवाह, मुलींवरील कौटुंबिक जबाबदाऱ्या, आणि आदिवासी कुटुंबाच्या आर्थिक अडचणी अशी कारणे या गळतीसाठी मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत. याशिवाय समाजातील लैंगिक असमानता, शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव आणि पालकांचा शिक्षणाकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन इत्यादी घटक या समस्येला अधिक तीव्र करतात. ग्रामीण भागातील शाळांपासूनचे अंतर,

सुरक्षिततेचा अभाव, आणि शिक्षणासाठी प्रोत्साहनाचा अभाव यासारख्या अनेक कारणांमुळे आदिवासी मुलींच्या शिक्षणात खंड पडतो. ही गळती रोखण्यासाठी या कारणांवर सखोल विचार करून त्यावर उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. आदिवासी प्रामुख्याने डोंगर, दर्या व दुर्गम भागांमध्ये निवास करतो. या भागात मुलभूत सोई-सुविधांचा अभाव असतो. त्याचबरोबर बहुतांश आदिवासी भागात प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची कमी संख्या, शिक्षणाच्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि दर्जेदार शिक्षणाच्या संधींची कमतरता यामुळे आदिवासी मुलींची शैक्षणिक गळती होते.

आदिवासी मुलींच्या शिक्षणातील गळतीसाठी अनेक सामाजिक-सांस्कृतिक कारणेही जबाबदार आहेत. आदिवासी लोकांचा शिक्षणाविषयीचा उदासीन दृष्टिकोन आणि पारंपरिक मानसिकता यामुळे काही लोक मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देत नाहीत. शिक्षणाऐवजी त्यांना पारंपरिक जबाबदाऱ्या सांभाळण्यावर भर दिला जातो. मुलींच्या शिक्षणातील गळतीसाठी समाजातील लैंगिक असमानता, रुढी-परंपरा. आणि चुकीच्या धारणा कारणीभूत ठरतात. मुलींवर घरगुती जबाबदाऱ्या टाकणे, लवकर विवाह लावणे, आणि शिक्षणाऐवजी त्यांना घरकामासाठी तयार करणे ही समस्या अधिक तीव्र आहेत. मुलगा कुटुंबाचा आधार मानला जातो, तर मुलींच्या शिक्षणाला दुय्यम स्थान दिले जाते. काही समाजांतील चुकीच्या समजुती आणि सामाजिक दबाव यामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट राहते. या समस्येवर मात करण्यासाठी जनजागृती, पालक प्रबोधन, आणि बालविवाह रोखण्यासाठी कठोर उपाययोजना गरजेच्या आहेत.

आदिवासी मुलींच्या शैक्षणिक गळतीसाठी आर्थिक कारणेही जबाबदार आहेत. आदिवासी कुटुंबांमध्ये गरिबी ही महत्त्वाची समस्या आहे. कुटुंबांच्या उत्पन्नाचा आधार अधिकतर शेती, मजुरी, किंवा जंगलांवर अवलंबून असतो. त्यामुळे मुलींचे शिक्षण खर्च परवडत नाही आणि त्यांना मजुरीसाठी पाठवले जाते. मुलींना लहान वयातच भावंडांची काळजी घेणे, स्वयंपाक, पाणी भरणे, आणि इतर घरगुती कामे यासाठी जबाबदाऱ्या दिल्या जातात, ज्यामुळे त्यांचे शिक्षण पूर्ण होत नाही. शिक्षणाशी संबंधित शासकीय योजनांची प्रभाव अंमलबजावणी नसणे हे कारण देखील या मुलींच्या शैक्षणिक गळतीसाठी कारणीभूत आहे.

**आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय आणि शिफारसी:**

आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी पुढील काही उपाययोजना करता येतील.

1. आदिवासी महिलाकेंद्रित शैक्षणिक धोरणात्मक उपाय: - आदिवासी महिलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून विशेष धोरणे राबविणे आवश्यक आहे. दुर्गम भागांमध्ये शाळा, वसतिगृहे व उच्च शिक्षणाच्या सुविधा वाढवल्यास शिक्षणातील सहभाग वाढू शकतो
2. शिक्षणाबाबत सामाजिक जागरूकता निर्माण करणे: - आदिवासी समाजात मुलींच्या शिक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी जनजागृती अत्यावश्यक आहे. पालक व समाजाला शिक्षणाचे दीर्घकालीन फायदे समजावून सांगितल्यास मुलींची शाळेत उपस्थिती व टिकाव वाढेल.
3. आदिवासी महिलांच्या शिक्षणासाठी सार्वजनिक–खासगी भागीदारी: - शासनासोबत खासगी संस्था व स्वयंसेवी संघटनांच्या सहभागातून शैक्षणिक सुविधा आणि व्यावसायिक शिक्षणाचा विस्तार करता येईल. यामुळे शिक्षणासोबत रोजगाराच्या संधीही निर्माण होतील.

4. शैक्षणिक योजनांची प्रभावी अंमलबजावणी: - आदिवासी महिलांसाठी असलेल्या शासकीय योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. नियमित देखरेख व स्थानिक सहभागामुळे योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने लाभार्थ्यांपर्यंत पोहोचू शकतो
5. आदिवासी महिलांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर: - डिजिटल साधनांच्या वापरामुळे दुर्गम भागांतील शिक्षण सुलभ होऊ शकते. ऑनलाइन शिक्षण व डिजिटल साक्षरतेमुळे आदिवासी महिलांचे शिक्षणातील सातत्य टिकून राहू शकते.
6. महिला शिक्षकांची भरती व स्थानिक शिक्षकांना प्राधान्य: - आदिवासी भागांमध्ये महिला शिक्षकांची नियुक्ती केल्यास मुलींमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होते. स्थानिक शिक्षकांमुळे भाषा व संस्कृतीशी सुसंगत शिक्षण देता येते.
7. मुलींसाठी सुरक्षित व अनुकूल शालेय वातावरण निर्माण करणे: - शाळांमध्ये सुरक्षित सुविधा उपलब्ध झाल्यास आदिवासी मुलींची शाळेत उपस्थिती वाढते. सुरक्षित वातावरणामुळे शैक्षणिक गळती कमी होण्यास मदत होते.
8. आर्थिक प्रोत्साहन योजना अधिक बळकट करणे: - आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी शिष्यवृत्ती व इतर सहाय्य योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. आर्थिक पाठबळ मिळाल्यास मुलींचे शिक्षण पूर्ण होण्यास मदत होते.
9. पालक प्रबोधन व समुदाय सहभाग: - पालक व समुदायाचा सक्रिय सहभाग मिळाल्यास मुलींच्या शिक्षणाला सामाजिक मान्यता मिळते. सामूहिक प्रयत्नांमुळे शिक्षणाविषयी सकारात्मक बदल घडतो.
10. बालविवाह प्रतिबंध व कायदेशीर अंमलबजावणी: - बालविवाह रोखल्यास मुलींचे शिक्षण अखंडित राहू शकते. कायद्यांची कठोर अंमलबजावणी व जनजागृती यामुळे शिक्षणात सातत्य राखता येईल.
11. उच्च शिक्षण व रोजगाराशी जोडलेले शिक्षण: - शिक्षणाला रोजगाराची जोड दिल्यास आदिवासी मुलींमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह वाढतो. रोजगाराभिमुख शिक्षणामुळे त्यांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणास चालना मिळते.वरील उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती सुधारण्यास मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकते.

**सारांश:**

सदर संशोधन लेखातून आदिवासी महिलांच्या शिक्षणाची सध्यस्थिती, त्यांना शिक्षणविषयक भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. अभ्यासातून असे स्पष्ट होते की, गेल्या काही दशकांत आदिवासी महिलांच्या साक्षरतेत वाढ झाली असली तरी ती पुरुषांच्या तुलनेत आणि राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत अद्याप कमीच आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व भौगोलिक अडथळ्यांमुळे आदिवासी महिलांचे शिक्षण अनेक स्तरांवर खंडित होत असल्याचे आढळून येते. गरिबी, बालविवाह, घरगुती जबाबदाऱ्या, दुर्गम भागातील अपुऱ्या शैक्षणिक सुविधा आणि पालकांमधील शिक्षणाविषयीची उदासीनता ही शैक्षणिक गळतीची प्रमुख कारणे आहेत.

सरकारने आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा, शिष्यवृत्ती, वसतिगृहे व इतर अनेक योजना राबविल्या असल्या, तरी त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीचा अभाव ही एक मोठी मर्यादा असल्याचे या अभ्यासातून दिसून येते.

शाळांतील पायाभूत सुविधांचा अभाव, विशेषतः मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित सोयी नसणे, हे शिक्षणात टिकून राहण्यास अडथळा ठरते. तसेच, स्थानिक भाषा व संस्कृतीशी विसंगत अभ्यासक्रमामुळे आदिवासी मुलींमध्ये शिक्षणाविषयी भाव निर्माण होतो. त्यामुळे शिक्षण केवळ उपलब्ध करून देणे पुरेसे नसून ते आदिवासी समाजाच्या वास्तवाशी सुसंगत असणे आवश्यक आहे.

आदिवासी महिलांचे शैक्षणिक सक्षमीकरण हे केवळ त्यांच्या वैयक्तिक विकासापुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. यासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, शिक्षक आणि समुदाय यांचे संयुक्त व समन्वित प्रयत्न गरजेचे आहेत. धोरणात्मक सुधारणा, जनजागृती, प्रभावी अंमलबजावणी आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास आदिवासी महिलांच्या शिक्षणातील अडथळे दूर करता येतील. अखेरीस, आदिवासी महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेणे हे समतामूलक, समावेशक व शाश्वत विकासाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

**संदर्भसूची:**


1. *आगलावे, प्रदिप. (2018). भारतीय समाज संरचना आणि परिवर्तन. नागपूरः श्री साईनाथ प्रकाशन, पृ. क्र. 154*
2. *खोडेवाड देविदास, २०१८, महाराष्ट्रातील आदिवासी जीवन, विद्या पब्लिकेशन, औरंगाबाद.*
3. *कुलकर्णी शौनक, २००९ 'महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशस, पुणे.*
4. *कोडीतकर सुरेश, २००८, आदिवासी जीवन कथा आणि व्यथा, सुगावा प्रकाशन, पुणे.*
5. *5.सावरा मिरा, १९८८ "आदिवासी स्त्रीयाच्या समस्या व विकास' आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.*
6. *निकम गौतम, २०१५, आदिवासीच्या समस्याः एक अभ्यास, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव.*
7. *घोडवाडीकर आनंद, आदिवासी महिलांची सध्यस्थिती आणि समस्या*, Knowledge Resonance -A half year Research Journal Page no.215-220
8. *वागडव अप्पाराव, भारतातील आदिवासी महिला आणि शिक्षणाची गरज,* Knowledge Resonance -A half year Research Journal Page no.196-200
9. 9.Azad Ahmad Andrabi (2014). Tribal Education and Government Interventions. International Research Journal of Management Sociology & Humanity, Volume 5 Issue , Pg. 316-323
10. Amar Kumar Singh & C. Rajyalakshmi, Status of Tribal Women in India, 23 Social Change, 3-18 (1993) Aparna Mitra, The status of women among the scheduled tribes in India, 37 The Journal of Socio-Economics, 1202-1217 (2008)
11. Devi Ahiliya Vishvavidyalaya, Status Of Tribal Women In India With Special Reference To The Socio-Economic And Educational Condition, 18 Ilkogretim Online - Elementary Education Online, 2284-2292 (2019)

12. Ghosh, Arun Kumar. (2007). The Gender Gap in Literacy and Education Among the Scheduled Tribes in Jharkhand and West Bengal. Sociological Bulletin, 56 (1): 109-125.
13. Jitendra Kumar Premi, Domestic violence against tribal women: With special reference to Pardhi and Gond tribes of Chhattisgarh, 7 Research Journal of Humanities and Social Sciences, 205 (2016)
14. 14.Jyotirmayee Mohapatra, Literacy Among Tribal Girls and Women- "An Overview," India Education, Aug. 14, 2020
15. Kumar, V., T.R. Singh, S.R. Yadav and R.P. Singh. (1985). "Employment and income pattern of women labour in modern agriculture in District Meerut (U.P.)". Indian Journal of Agricultural Economics, 40(3): 276-277.
16. National Policy on Education (1986). Ministry of Human Resource Development, Government of Pg. 7-8, retrieved from http://www.ncert.nic.in/oth_anoun/policy 1986 India, pdf
17. Ministry of Tribal Affairs. Government of India. Annual Report-2021-22'
18. https://tribal.nic.in/downloads/istics/Annual Report/4R English2021.pdf Page. No. 33
19. Maji, Subarna. (2016). Educational Status of Tribal Women in West Bengal. International Journal of Allied Practice. Research and Review, 3(9): 6-10. Accessed from http://www.ijaprr.com/download/issue/Volume_III/I ssue X/132_Volume_III_Issue_X_0 10_Subarna Maji.pdfon 26-03-2023 6-
20. Sahal, Kalyani. (2022). Unit 13: Problems of Tribal Women, Paper: Tribal Culture in India, B.Sc. Anthropology, IGNOU. https://www.egyankosh.ac.in Accessed from /bitstream/123456789/86964/1/Unit-13.pdf on 25-03-2023.
21. Rami, Gaurang. (2012). Status of Primary Education in the Tribal District of Gujarat: A Case Study of the Dangs District. International Journal of Rural Studies, 19(1):1-6